# ‘पर्यावरण क्रांती’ चित्रकला स्पर्धेत हजारो चिमुकल्यांचा सहभाग

**इको नीडस् फाऊंडेशनचा उपक्रम**

औरंगाबाद, दि.२ (लोकमत ब्युरो)- पर्यावरण क्षेत्रात काम करणाऱ्या इको नीडस् फाऊंडेशन या संस्थेने आयोजित केलेल्या ‘पर्यावरण क्रांती-२०११’ चित्रकला स्पर्धेत रविवारी हजारो चिमुकल्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

सिद्धार्थ उद्यानात आयोजित केलेल्या या चित्रकला स्पर्धेत शहरातील विविध शाळांतील हजारो मुला-मुलींनी पर्यावरण जनजागृतीबाबतची उत्कृष्ट चित्रे रेखाटली. या स्पर्धेच्या उद्घाटन समारंभास राज्य उत्पादन शुल्क विभागाचे उपआयुक्त विश्वनाथ इंदिसे, आयकर विभागाचे सहआयुक्त डॉ. सत्यपाल मीना, उमाशंकर प्रसाद व नगरसेवक राजेंद्र जाधव हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी फाऊंडेशनचे अध्यक्ष पर्यावरणतज्ज्ञ प्रा. प्रियानंद आगळे होते. ‘इको रिहोल्युशन-२०११’ या स्पर्धेच्या अनुषंगाने उपआयुक्त इंदिसे, सहआयुक्त सत्यपाल मीना व प्रसाद यांनी ‘पर्यावरण बचाव’ याबाबत मार्गदर्शन केले. प्रा. आगळे यांनी नहर-ए-अंबरीचे महत्त्व विशद केले. यावेळी सर्व सहभागी विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते प्रमाणपत्र व खाऊचे वाटप करण्यात आले. यावेळी ‘एक झाड-एक माणूस’ हे सूत्र अमलात आणणे व प्लास्टिकचा उपयोग टाळण्याची सामूहिक शपथ घेण्यात आली.

या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी रोहित थोरात, मंगेश गांगे, अभिषेक गेडाम, सुमीत उबाळे, प्रणय कुस्नेनीकर, सचिन शिरसाठ, शिवाजी वाघमारे, ॲड. नीलेश ददे, ॲड. अत्तदीप आगळे, प्रदीप पवार आदींनी परिश्रम घेतले.



■ इको नीडस् फाऊंडेशनच्या वतीने आयोजित ‘पर्यावरण क्रांती-२०११’ चित्रकला स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देताना उत्पादन शुल्क विभागाचे उपआयुक्त विश्वनाथ इंदिसे, आयकर विभागाचे सहआयुक्त डॉ. सत्यपाल मीना, उमाशंकर प्रसाद, फाऊंडेशनचे अध्यक्ष पर्यावरणतज्ज्ञ प्रा. प्रियानंद आगळे.